अज क्रमांक 1308/20
अर्जदाराचे नाव राॅक फुरियो
नक्कलेचा अर्ज आला तो दिनांक 30/11/20
नक्कल तयार दिनांक
नक्कल दिली तो दिनांक 09/12/2020
रक्कम रुपये 44/-
दि. 09/12/20 रोजी मिळाले.

सुधारित प्रत

Exh-11

परिशिष्ट "ब"

"वेस्ट मॅनेजमेंट सोसायटी, यवतमाळ"

(Waste Management Society, Yavatmal)

ता. जि. यवतमाळ

I/c अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
यवतमाळ

## मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन

१) संस्थेचे नांव : **वेस्ट मॅनेजमेंट सोसायटी, यवतमाळ, ता. जि. यवतमाळ**

२) कार्यालयाचा पत्ता: **पहिला माळा घर क्र. १०६/१५२, व्ही.एच.बी. कॉलनी, बाजोरीया नगर, यवतमाळ - ४४५००१ महाराष्ट्र भारत**

३) संस्थेचे उद्देश :

१) तळागाळातल्या व्यक्ती, लहान शेतकरी, कलाकार, शेतमजूर व अन्य गोरगरीब तसेच आदिवासी, विमुक्त व भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

२) ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे प्रशिक्षण देणे

३) समाज कल्याण संबंधी राबविल्या जाणाऱ्या योजना तसेच ग्रामोद्योग मंडळ, खेळ व क्रीडा, आरोग्य इत्यादीसाठी योजनांचा प्रचार करणे व त्या अनुषंगाने कार्यक्रम राबविणे

४) अनेक विविध प्रकारच्या संस्था, जसे बालवाडी ते उच्च शिक्षणापर्यंत सुविधा पुरविणे व त्याचप्रमाणे प्रशिक्षण केंद्र, तांत्रिक शाळा उघडणे.

५) बालकल्याण, महिला कल्याण, युवक कल्याण, वृद्धाश्रम, वसतीगृह स्थापन करणे व त्या अनुषंगाने कार्यक्रम राबविणे. पर्यावरण दृष्टीने पडीत जमीन विकास, पाणलोट क्षेत्र, विकासासंबंधी लोकांमध्ये जागृती निर्माण करुन लोककल्याणासाठी तसे कार्यक्रम राबविणे.

६) कामगार महिलांसाठी वसतीगृह व आदिवासी, मागासवर्गीयांसाठी आश्रमशाळा उघडणे व चालविणे.

७) क्रिडा खेळ, क्रिडा स्पर्धा, क्रिडा महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादीचे आयोजन करणे.

Assistant Charity Commissioner
सत्यमेव जयते
YAVATMAL

८) मनुष्य बळ विकास, क्रीडा व युवक कल्याण, ग्रामीण विकास, समाज कल्याण वन व पर्यावरण इत्यादी केंद्र व राज्य सरकारच्या असलेल्या योजना राबविणे.

९) दवाखाना, नर्सिंग होम, आरोग्य, शिक्षण, महिला कल्याण केंद्र, धर्मशाळा, गुरांचा मोफत दवाखाना स्थापन करणे व चालविणे.

१०) राष्ट्रीय एकात्मता, नैतिक शिक्षण देणे, सर्व धर्म भाव जोपासणे व राष्ट्रीय एकात्मतासंबंधी काम करणे.

११) नशाबंदी करणे व त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची त्यांना कल्पना देणे व त्या अनुषंगाने विविध कार्यक्रम राबविणे.

१२) पर्यावरण विषयक जाणीवजागृती निर्माण करणे, टाकाऊ / निरुपयोगी वस्तुंची विल्हेवाट लावून पर्यावरणाचा समतोल राहण्यासंबंधी शिक्षण / प्रशिक्षण देऊन त्यासंबंधी विविध उपक्रम राबविणे.

१३) मानवाधिकाराचा परिणाम व दुष्परिणामाचा संशोधनात्मक अभ्यास करुन त्याद्वारे लोकांना उन्नत शिक्षण तसेच जनजागृती निर्माण करुन त्या दृष्टीने उपयुक्त व परिणामात्मक उपक्रम राबविणे.

१४) धर्मादाय दृष्टीकोणातून विश्वस्त ठरवतील त्याप्रमाणे मानवाधिकाराच्या सर्व प्रकारच्या उल्लंघनास प्रतिबंध करणे, त्यासंबंधीची प्रकरणे हाताळणे, त्याचप्रमाणे बाधित व्यक्तींना शक्य ती मदत करणे.

Assistant Charity Commissioner सत्यमेव जयते YAVA...

खरी नक्कल म्हणून प्रमाणित

प्रमाणित प्रत तयार करणारा

कनिष्ठ लिपिक

I/c अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
यवतमाळ

R. Coutinho

१३०८/२०२०
अर्जदाराचे नाव शेख कुरैशी
नकलेचा अर्ज आला तो दिनांक 30/11/20
नक्कल तयार दिनांक 09/12/2020
नक्कल दिली तो दिनांक
... रुपये 44/-
09/12/2020 ...रोजी मिळाले.

परिशिष्ट "क"

"वेस्ट मॅनेजमेंट सोसायटी, यवतमाळ"

(Waste Management Society, Yavatmal)

ता. जि. यवतमाळ

Charity Commissioner
सत्यमेव जयते
YAVATMAL

I/c अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
यवतमाळ

## -: नियम व नियमावली :-

१) **नियमावलीतील संदर्भिय शब्दांची व्याख्या :-**

वेस्ट मॅनेजमेंट सोसायटी, यवतमाळ, ता. जि. यवतमाळ असे समजण्यात येईल,

२) **कार्यकारी मंडळ :-**

वेस्ट मॅनजमेंट सोसायटी, यवतमाळ ता.जि. यवतमाळ या संस्थेच्या कार्यकारी मंडळ असे समजण्यात येईल.

३) **सभा म्हणजे :-**

वेस्ट मॅनेजमेंट सोसायटी, यवतमाळ ता.जि.यवतमाळ या संस्थेच्या कार्यकारी मंडळाची सभा असे समजण्यात येईल.

**अध्यक्ष म्हणजे :-**

वेस्ट मॅनेजमेंट सोसायटी, यवतमाळ ता.जि. यवतमाळ या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष असे समजण्यात येईल.

**उपाध्यक्ष म्हणजे :-**

वेस्ट मॅनेजमेंट सोसायटी, यवतमाळ ता.जि. यवतमाळ या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा उपाध्यक्ष असे समजण्यात येईल.

**सचिव म्हणजे :-**

वेस्ट मॅनेजमेंट सोसायटी, यवतमाळ ता.जि. यवतमाळ या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा सचिव असे समजण्यात येईल.

**कोषाध्यक्ष म्हणजे :-**

वेस्ट मॅनेजमेंट सोसायटी, यवतमाळ ता.जि. यवतमाळ या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा कोषाध्यक्ष असे समजण्यात येईल.

**सभासद म्हणजे :-**
वेस्ट मॅनेजमेंट सोसायटी, यवतमाळ ता.जि. यवतमाळ या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा सभासद असे समजण्यात येईल.

Commissioner
MAL

२) **संस्थेचे कार्यक्षेत्र :-**
या संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारत देशांतर्गत राहील.

३) **हिशोबाचे वर्ष :-**
या संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर राहील.

४) **सभासदत्व व त्यांची नोंदणीची पद्धत :-**
भारतीय कोणत्याही १८ वर्षावरील व्यक्तीस या संस्थेचा सभासद होता येईल. सभासद होणाऱ्या व्यक्तीला अध्यक्षांचे नावे रितसर अर्ज करावा लागेल. आलेल्या अर्जाचा कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यावर तसेच सभासदाची निर्धारित केलेली वर्गणी संस्थेत जमा केल्यानंतरच त्या व्यक्तीला सभासद असे समजण्यात येईल. कार्यकारी मंडळ सभासदत्व खालील कारणांवरून प्रथम नाकारु शकतील ती कारणे येणेप्रमाणे :-
वेडा, दिवाळखोर, गुन्हेगार, संस्थेच्या हिताविरुद्ध काम करणारी व्यक्ती.

५) **सभासदाचे प्रकार :-**
अ) आजीव सभासद रु. १००१/- वर्गणी भरणाऱ्याला साधारण सभासद असे समजण्यात येईल.
ब) साधारण सभासद रु. ५०१/- वार्षिक वर्गणी देणाऱ्याला साधारण सभासद असे समजण्यात येईल.
क) संस्था स्थापनेच्या वेळी सर्व सभासद आजीवन सभासद असे समजण्यात येईल, सदस्य या पदासाठी उभे राहता येईल.

६) **सभासदत्व रद्द करणे :-**
कोणत्याही सभासदाचे संस्थेच्या घटनेविरुद्ध कार्य केल्यास किंवा कार्यकारी मंडळाच्या सभेला सतत तीन वेळेस गैरहजर राहिल्यास किंवा सभासद फी न भरल्यास त्यांचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील व त्याबाबत ठराव सभेत मंजूर करण्यात येईल.

७) **सर्वसाधारण सभा व तिचे अधिकार व कर्तव्य :-**
अ) सर्वसाधारण सभा वर्षातून एकदा तरी घेतली गेली पाहिजे.

ब) अध्यक्षाचे परवानगीने वेळेवर येणारे ठराव सभेपुढे मांडून त्यावर निर्णय देणे
क) सभासदांचे बहूमताने ठराव मंजूर करुन संस्थेच्या नियमावलीत, नावात तसेच उद्देशात बदल करणे.
ड) नवीन कार्यकारी मंडळाची निवड करणे.
इ) वार्षिक अंदाजपत्रक व जमाखर्च पत्रकास मंजुरी देणे.

८) सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या

सर्वसाधारण सभेची सूचना १० दिवस अगोदर सर्व सभासदांना नोटीसद्वारे प्रत्यक्ष अथवा पोस्टाने देणे आवश्यक राहील. सभेचा कोरम पूर्ण होण्यासाठी २/३ सभासद हजर असणे आवश्यक राहील. तहकूब सभेला कोरमचा बंधन राहणार नाही. परंतु अशी सूचना नोटीसमध्ये असणे आवश्यक राहील.

९) विशेष सर्वसाधारण सभा, तिचे कार्य :-

विशेष सर्वसाधारण सभा ही अत्यंत महत्त्वाच्या विषयासाठी तातडीने कामासाठी आयोजित करण्यात येईल. विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस १० दिवस अगोदर सर्व सभासदांना दिली जाईल. सभा ज्या कामासाठी बोलाविण्यात आली आहे त्याच विषयावर चर्चा होऊन ठराव मंजूर करण्यात येईल. सर्वसाधारण सभा जे कार्य करु शकते ते कार्य करण्याचा अधिकार त्या सभेला राहील.

१०) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची रचना :-

कार्यकारी मंडळ एकूण ९ सभासदांचे खालीलप्रमाणे राहील.
(१) अध्यक्ष-१, (२) उपाध्यक्ष-१, (३) सचिव-१, (४) कोषाध्यक्ष-१,
(५) सदस्य-५ असे राहतील.

११) कार्यकारी मंडळाचे कार्यकाल व निवडणुकीची पद्धत :-

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल ५ वर्षाचा राहील. कार्यकारी मंडळाची निवडणूक दर ५ वर्षांनी आमसभेत गुप्त मतदान पद्धतीने घेतली जाईल.

१२) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-

१) अध्यक्ष :-
अ) संस्थेचे कामकाज चालविणे
ब) संस्थेच्या हितासंबंधी संस्थेचा कार्यकारी प्रमुख म्हणुन योग्य ते आदेश देणे.
क) संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे

R. Gaikwad

ड) संस्थेची सभा आयोजित करण्यासाठी आदेश देणे.

इ) सचिव यांनी सादर केलेल्या हिशोब पुस्तकावर सह्या करणे.

२) उपाध्यक्ष :-

अ) अध्यक्षांचे गैरहजेरीत अध्यक्षांची कामे करणे, इतर वेळेत त्यांच्या कामात आवश्यक ती मदत करणे व जबाबदाऱ्या पार पाडणे.

३) सचिव :-

अ) कार्यकारी मंडळाच्या सभा अध्यक्षांच्या अनुमतीने आयोजित करणे.

ब) संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व कामे करणे.

क) संस्थेचा पत्रव्यवहार करणे, पार पाडणे.

ड) मंजूर झालेल्या ठरावाची अंमलबजावणी करणे.

इ) संस्थेच्या किरकोळ खर्चासाठी रु. ५००/- पर्यंत रक्कम जवळ ठेवणे.

ई) संस्थेच्या मालमत्तेवर देखरेख ठेवणे.

४) कोषाध्यक्ष :-

सचिवाच्या गैरहजेरीत सचिवाची कामे करणे, इतर वेळेत त्यांच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

५) कार्यकारी मंडळाचे सभासद :-

अ) संस्थेच्या सभेला उपस्थित राहणे व आवश्यक ती सर्व मदत करणे

ब) आमसभेला उपस्थित राहणे व कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीत भाग घेणे.

१३) कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :-

कार्यकारी मंडळाची सभा २ महिन्यातून एकदा तरी घेतली पाहिजे. सभेची नोटीस ५ दिवस अगोदर नोटीस बुकद्वारे किंवा रजिस्टर ए.डी.पोस्टाने घेणे आवश्यक राहील. कमीत कमी ३ सभासदांनी लेखी विनंती केल्यास अध्यक्षांनी त्वरीत सभा न बोलाविल्यास सभेची मागणी करणाऱ्या सभासदांना सभा आयोजित करण्यात अधिकार राहील.

१४) कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :-

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना ५ दिवस अगोदर नोटीस बुकाद्वारे किंवा रजिस्टर ए. डी. पोस्टाने देणे आवश्यक राहील. सभेसाठी २/३ सभासद हजर असणे आवश्यक राहील.

१५) कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियम :-

अ) संस्थेचे कोणत्याही प्रकारची बाकी घेणे आवश्यक असल्यास तो सभासद निवडणुकीसाठी अपात्र राहील.

ब) एक वर्ष सभासद राहिल्यानंतरच मतदानाचा अधिकार राहील.

क) निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती १५ दिवस अगोदर करण्यात येईल.

ड) निवडणुकीच्या तारखेची सूचना ३० दिवस अगोदर सर्व सभासदांना नोटीसद्वारे मिळाली पाहिजे.

१६) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :-

कार्यकारी मंडळातील एखाद्या सदस्याच्या राजीनाम्यामुळे मृत्यूमुळे, सभासदत्व रद्द केल्यामुळे पद रिक्त झाल्यास त्या पदी कार्यकारी मंडळातील सभासद बहुमताने नवीन सभासदाची निवड करतील.

१७) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य :-

१) कार्यकारी मंडळाची सभा ३ महिन्यातून एकदा तरी घेतली पाहिजे.

२) कार्यकारी मंडळाच्या ३ सभासदांनी लेखी मागणी केल्यास आठ दियसाच्या आत अध्यक्षांनी सभा बोलावली पाहिजे.

३) संस्थेच्या सेवकाची नेमणूक करणे, कामावरुन काढणे, त्यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे.

४) संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या इतर शाखांवर नियंत्रण ठेवणे.

५) संस्था घालविण्याकरीता आवश्यक ते नवीन नियम तयार करुन घेणे.

६) संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या वेळी मंजूर झालेल्या ठरावाची पूर्तता करणे.

७) संस्थेच्या वार्षिक मंडळाची यादी तयार करुन विभागीय सहाय्यक संस्था नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयातत ठरावाचे नकलेसह दाखल करणे. कार्यकारी मंडळात किंवा मालमत्तेत बदल झाल्यास विभागीय कार्यालयास कळविणे.

८) सभासदाची यादी ठेवणे, संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या नोकरीच्या अटीची पुस्तके, कायद्याप्रमाणे ठेवणे व त्याबाबतची माहिती नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात दरवर्षी पाठविणे.

९) तक्रारीची दखल घेणे व त्यावर योग्य ती कार्यवाही करणे.

१०) जमाखर्चाचे हिशोब ठेवून ऑडीट करुन घेऊन ऑडीट रिपोर्ट सर्वसाधारण सभेपुढे सादर करणे.

११) उपनियम तयार करणे, उपसमित्या स्थापन करणे, शाखा स्थापन करणे.

१२) कार्यकारी मंडळाची निवड झाल्यावर नवीन कार्यकारी मंडळ आपल्या मधून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष यांची निवड बहुमताने करणे.

१८) <u>संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग :-</u>

सभासद वर्गणी, देणगी, सरकारी, निमसरकारी, अनुदाने इत्यादी प्रकारे जमा होणारा निधी संस्थेची मिळकत समजली जाईल. संस्थेचा निधी बँकेत जमा राहील. बँकेतून पैसे काढण्याचा अधिकार अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा सचिव यापैकी कोणी एक व कोषाध्यक्ष यांच्या संयुक्त सहीने काढता येईल.

१९) <u>उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतूद (टक्केवारी प्रमाणे) :-</u>

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | शैक्षणिक | - | ८% |
| (ब) | सामाजिक | - | २५% |
| (क) | सांस्कृतिक | - | २% |
| (ड) | वैद्यकीय व निगा राखणे | - | २५% |
| (इ) | कायदेविषयक | - | ४०% |

२०) <u>कर्ज किंवा ठेवी यासंबंधीची तरतूद :-</u>

संस्थेसाठी कर्ज किंवा ठेवी घेणे आवश्यक किंवा ठेवी ठेवणे आवश्यक असल्यास मा. धर्मदाय सहआयुक्त, अमरावती यांचे परवानगीसाठी अर्ज करुन त्यांची मंजुरात मिळाल्यानंतरच व्यवहार करण्यात येईल.

२१) <u>स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणेबाबतची तरतूद :-</u>

संस्थेला आवश्यकता भासल्यास मुंबई सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये कलम २६ नुसार मा. धर्मदाय सहआयुक्त अमरावती यांच्याकडे रितसर अर्ज करुन त्यांची परवानगी मिळाल्यानंतरच खरेदी विक्रीचा व्यवहार करण्यात येईल.

२२) <u>बँक खाते</u>

संस्थेची शिल्लक रक्कम किंवा निधी राष्ट्रीयकृत अथवा सहकारी बँकेत संस्थेच्या नावाने जमा राहील. बँकेतून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव यापैकी एक व कोषाध्यक्ष असे दोघांच्या संयुक्त सहीने पैसे काढण्यात / काढता येईल.

R. Coutinho  E.D'souza  D. Rupange

२३) **सभासदांची यादी ठेवण्याची पद्धत :-**

१८६० चे नोंदणी अधिनियमावलीतील कलम १५ नुसार संस्थेत जे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ ची संस्था नोंदणी अधिनियमातील नियम १५ प्रमाणे अनु. क्रमांक ६ चे नमुन्यात ठेवण्यात येईल. तसेच नियम ७ प्रमाणे कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची १ व नियम ८ प्रमाणे संस्थेतील कर्मचाऱ्यांची अनुसूची २ मध्ये दरवर्षी मा. सहाय्यक संस्था निबंधक, यवतमाळ येथे पाठविण्यात येईल.

२४) **नियम व नियमावलीतील बदल करण्याची तरतूद :-**

संस्थेच्या आमसभेत ठराव घेऊन ३/५ बहुमताने मंजूर झाल्यानंतर आवश्यक ते नवीन नियम तयार करुन घेता येतील किंवा कमी करता येईल. त्यासाठी संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२५) **संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याची तरतूद :-**

संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करावयाचा असल्यास अथवा संस्थेचे विलिनीकरण करावयाचे असल्यास नोंदणी अधिनियमातील कलम १२ व १२ (अ) प्रमाणे कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

२६) **संस्था विसर्जन :-**

संस्थेच्या आमसभेत २/३ बहुमताने ठराव मंजूर करुन संस्थेचे सर्व प्रकारचे आर्थिक संबंधीचा व्यवहार पूर्ण करुन शिल्लक मालमत्ता दुसऱ्या संस्थेला दान म्हणून देता येईल. संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पूर्ण करावी लागेल किंवा दुसऱ्या संस्थेला संलग्न करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

## // दाखला //

दाखला देण्यात येते की, सदर नियमावली ही ''वेस्ट मॅनेजमेंट सोसायटी'' यवतमाळ, द्वारा- पहिला माळा घर क्र. १०६/१५२, व्ही.एच.बी. कॉलनी, बाजोरीया नगर, यवतमाळ - ४४५००१ महाराष्ट्र भारत या संस्थेच्या नियमावलीची खरी नक्कल आहे.

| अ.क्रं. | सभासदांचे नांव | पदनाम | सही |
|---|---|---|---|
| (१) | डॅरियल अँथोनी ब्रेगांझा | अध्यक्ष | [signature] |
| (२) | रॉक ॲग्नेलो कुटिन्हो | सचिव | R. Coutinho |
| (३) | एडवर्ड डिसोझा | कोषाध्यक्ष | [signature] |

स्थळ : यवतमाळ

दिनांक :

Assistant Charity Commissioner
सत्यमेव जयते
YAVATMAL

खरी नक्कल म्हणून प्रमाणित

प्रमाणित प्रत तयार करणारा

कनिष्ठ लिपिक

I/c अधीक्षक

...र्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,

यवतमाळ